# फळसेवाडी हितकारी संस्था
## वार्षिक सर्वसाधारण सभा

**दिनांक** : शनिवार 03 डिसेंबर 2005
**स्थळ** : वीर कोतवाल गार्डन, दादर – पश्चिम

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 13. श्री जयवंत नाना राणे |
| 2. श्री उदय भगवान राणे | 14. श्री भरत गणपत राणे |
| 3. श्री मधुसुदन श्रीधर राणे | 15. श्री सुरेश रघुनाथ राणे |
| 4. श्री मधुकर संभाजी राणे | 16. श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे |
| 5. श्री पांडूरंग सावजी राणे | 17. श्री रंजन रावजी म्हसकर |
| 6. श्री भास्कर दौलत राणे | 18. श्री मंगेश राणे |
| 7. श्री मंगेश मनोहर राणे | 19. श्री एकनाथ अनंत राणे |
| 8. श्री अविनाश बाळकृष्ण राणे | 20. श्री अशोक दत्ताराम राणे |
| 9. श्री रत्नकांत बालशिवाजी राणे | 21. श्री मेघश्याम राणे |
| 10. श्री गंगाराम महादेव राणे | 22. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 11. श्री विरेन्द्र अनंत राणे | 23. श्री प्रविण मनोहर राणे |
| 12. श्री मनोहर भिकाजी राणे | |

उपरोक्त संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा (तातडीची) शनिवार दिनांक 3 डिसेंबर 2005 रोजी वीर कोतवाल गार्डन, दादर – पश्चिम येथे सायंकाळी 4:00 ते 7:00 यावेळात संपन्न झाली. संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे या सभेस उपस्थित होते. दिनांक 3 डिसेंबर 2005 रोजी झालेल्या या सभेस एकूण 23 सभासद उपस्थित होते.

या सर्व सभासदांचे अध्यक्षांनी स्वागत केले व त्यानंतर रितसर चर्चेस सुरवात झाली. या सभेत एकच महत्वाचा मुद्दा चर्चे आला तो म्हणजे नामदार नारायणराव तातू राणे यांचा सत्कार व त्या अनुशंगाने चर्चा.

प्रथम या बाबतीत असा प्रश्न आला की पिसेकामते-फळसेवाडी व वरवडे-फळसेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने सत्कार करणे. या विषयावर साधक-बाधक चर्चा झाली व फक्त पिसेकामते-फळसेवाडी याच संस्थेने सत्कार करण्याचे ठरले. या विषयावर असे ठरले की प्रथम वाडीतील श्री अशोक दत्ताराम राणे व श्री विरेन्द्र अनंत राणे यांनी नामदार नारायणराव तातू राणे यांची भेट घेऊन वेळ ठरवून प्रथम वाडीतील उपस्थितांसह साधा सत्कार करावा त्यानंतर वाडीतील ग्रामस्थांचे स्नेहसंम्मेलन घ्यायचे व त्यासाठी अंदाजे रु.25000/- खर्च येईल अशी अपेक्षा ठेऊन रु.301/- प्रमाणे प्रत्येक नोकरदाराकडून जमा करायचे व या जमा रक्कमेतून व देणगीदारांकडून आलेल्या वर्गणीतून एक व्यवस्थीत संम्मेलन घ्यावे व स्नेहसंम्मेलनाला दादा व वहिणींस बोलावून त्यांचा सत्कार करावयाचा.

पुर्नलिखित इतिवृत्त
मुळ दस्तऐवज : MR-02-(51 to 52)

रु.301/- प्रमाणे रक्कम 10 तारखेपर्यंत जमा करावयाचे असे ठरले. यासाठी श्री भास्कर दौलत राणे, श्री मेघश्याम राणे, श्री विरेन्द्र अनंत राणे, श्री जयवंत नाना राणे, श्री भरत गणपत राणे व श्री रविन्द्र शिवाजी राणे यांची कमिटी बनविण्यात आली.

वरवडे-फळसेवाडी येथील राणे मंडळींस संस्थेचे सभासद बनविणे यासाठी काही सभासदांनी ठराव मांडला. यावेळी अध्यक्षांनी असे सुचविले की सत्कार समारंभ व स्नेहसंम्मेलन आटोपल्यावर याविषयी सर्वसाधारण सभेत निर्णय घेता येईल.

मिटींग संपताना दुःखद निधन ठराव – वाडीतील आपल्यातून देवाज्ञा झालेल्या व्यक्तींना आदरांजली वाहून दुःखद निधनाचा ठराव करण्यात आला. कै इंदुमती द राणे, कै राजेश सावंत, कै आनंदी सावंत, कै दिनकर संभाजी राणे.

या मिटींगमधील सभासदांच्या चहापाण्याचा खर्च श्री अविनाश बाळकृष्ण राणे यांनी केला. ही सभा सर्व जेष्ठ सभासदांचे व उपस्थितांचे आभार मानुन 7:00 वाजता संपली.

---